# कै. आप्पांच्या आठवणी, विचार आणि कार्य



०७/०९/२०१५

---

**शहाणी माणसे संघटित करू या !**

'माणसे कमी आहेत. शहाणी माणसे त्याहून कमी आहेत. म्हणून शहाण्या माणसांना आधी आपल्याकडे आकर्षित करून घेऊन त्यांना कामाला लावले पाहिजे हे सुचले आणि ज्ञान प्रबोधिनीची स्थापना झाली. देशाच्या पुनर्रचनेला केवळ चांगले विचार पुरणार नाही तर त्यासाठी  विशाल कर्तृत्व, निश्चयशक्ती, प्रेरक शक्ती, समस्यांचे स्वरूप बरोबर समजून घेणे आणि समस्यांवर बरोबर उपाय शोधून काढणे याची आवश्यकता आहे. प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांनी अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा हव्यास धरला पाहिजे. जे गुण जिथे पाहिले ते गुण आपल्यात नसल्यास प्रयत्नपूर्वक मिळवले पाहिजेत.'

ज्ञान प्रबोधिनीत पुढे 'नेतृत्वशिक्षण' या नावाने आकाराला आलेल्या कार्यकल्पनेचं बीज या विचारात आहे. या देशाला चारित्र्यसंपन्न, कर्तृत्वसंपन्न नेतृत्वाची गरज आहे, आणि ते देण्याची योजना शिक्षणाद्वारे केली पाहिजे असा विचार आप्पांच्या मनात या काळात दृढमूल होत चाललेला होता. १९५४ मध्ये राष्ट्र सेवा दलाचे संस्थापक डॉ.ना.सु.हर्डीकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त एक अखिल भारतीय निबंध स्पर्धा आयोजित केलेली होती. विषय होता 'नेतृत्वविकसन', आणि याच विषयावर तर आप्पांचं सतत चिंतन चाललेलं होतं ! त्यांनी आपल्या कल्पना शब्दांकित केल्या. परीक्षकांना त्या अतिशय विचारार्ह वाटल्या. या स्पर्धेचं 'जवाहरलाल नेहरू पारितोषिक' विनायक विश्वनाथ पेंडसे यांना मिळालं. कॉंग्रेस भवनवर श्री. रावसाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम झाला. हे निबंध स्पर्धेतलं यश तसं सामान्य नव्हतं. अनेक दिशांनी वाढण्याची बीजशक्ती असलेल्या प्रबोधिनीच्या संकल्पनेचं पूर्वचिंतन त्या निबंधात होतं.

---